# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 69 / 2023 दिनांक : 13.02.2023

दिनांक 03 फेब्रुवारी, 2023 रोजी शिवणी येथील यात्रेमध्ये झळकवाडी येथील मुलांचा वाद झाला होता. मौ. शिवणी येथील गावकऱ्यांनी 1) विशाल मेडेवार, 2) सुर्यकांत कारलेवाड, 3) आदर्श बादरवाड, 4) मनीकंठ कोंडलवाड, 5)लक्ष्मण कोरलेवाड, 6) सुरेश कोरलेवाड, यांनी यात्रेमध्ये वाद निर्माण केला. झळकवाडी येथील तक्रारदार 1)चांपती बाबुराव झाडे 2) मंगेश रामकिशन वागतकर 3)सचिन दिंगांबर डुकरे 4) तुकाराम हौसाजी झळके यां सार्वाना पोलीस स्टेशन इस्लापुर येथे आणले गावकऱ्यांनी सांगीतले की, केसेस झाल्यावर मुलांचे जिवन उध्वस्त होईल समज देवुन वाद मिटवुन अपसात समेट घडुन आणावा असे सांगीतल्यावरून सर्वाना समज द्या व पुन्हा भांडण होणार नाही असी समज द्या असे सांगीतले. सदरचा प्रकार अंतर्गत वादावरून घडला होता.

सदर प्रकरणांमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कंधार श्री मारोती थोरात यांचेकडे प्राथमीक चौकशी दिल्याने सर्व मुलांचे जबाब घेण चालु आहे. कांही मुले बाहेर गावी गेलेले आहेत. चौकशी मध्ये कांही आढळल्यास संबधीतावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सपोनि श्री रघुनाथ शेवाळे, दोन्ही बाजुची तक्रार घेवुन गुन्हे दाखल करणे आवश्यक होते. तसेच त्यांनी न करता गावकऱ्यांच्या दबावाला बळी पडुन त्यांनी आपसात मिटवा मिटवी करण्याचा प्रयत्न केला. म्हणुन त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना मारहाण करीत असले बाबतचा एक व्हिडीओ समाज माध्यमाद्वारे प्रसारीत झालेला आहे. त्यामध्ये गोरक्षणाच्या प्रकरणातुन मारहाण केलेली आहे असे समाज माध्यमातुन प्रसारीत करण्यात येत आहे. यात कोणतेही तथ्य नाही. सदर प्रकरण हे गावांतील आपसातील वाद, व भांडण झाल्यामुळे घडले असुन त्यात गोरक्षक, इतर कोणत्याही संघटनेशी संबध नाही.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 69/2023 दिनांक : 13.02.2023

## 1)जबरी चोरी :—

**1)विमानतळ** :—दिनांक 09.02.2023 रोजी चे सायंकाळी 07.15 वा. चे सुमारास, **आनंद चव्हाण यांचे घराजवळ आनंदनगर नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे रोडने फोनवर बोलत जात असतांना यातील अज्ञात आरोपीतांनी सगणमत करून फिर्यादीचे पाठीमागुन मो सा क्रमांक एमएच–26/सीडी–7458 वर आले व त्यापैकी मधल्या आरोपीने फिर्यादीचे हातातील शोमी कंपणीचा मोबाईल किंमती 26,000/–रू चा जबरदस्तीने हिसकावुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी महेशकुमार बालाजीराव गुरलेवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. समर्थनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 51/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधव, मो.क्रं. 9765902710** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**1)नांदेड ग्रामीण** :— दिनांक 07.02.2023 रोजी चे 20.30 ते दि. 12.02.2023 रोजी चे 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे भाडयाने राहत असलेले कमल किशोर महात्मे यांचे घरी जुना कौठा ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी राहत असलेले भाडयाचे घराचे दाराचे कुलूप लावण्याचे हुक तोडुन घरात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोरटयाने कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने किंमती 60,000/–रूपयाचे व नगदी 1,95,000/–रूपये असा एकुण 2,55,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी यदुराज प्रभु कदम, वय 35 वर्षे, व्यवसाय बांधकाम विट व्यवसाय रा. वाजेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 89/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1224 सुर्यवंशी, मो.क्रं. 8329712505** हे करीत आहेत.

**2)नायगांव** :— दिनांक 12.02.2023 रोजी चे 02.50 ते 03.50 वा. चे दरम्यान, **मौ. रातोळी व गडगा ता. नायगाव जि. नांदेड येथे**, यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे कापड दुकानाचे व त्या शेजारी पोस्ट ऑफिसचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून नगदी रूपये व कपडे व पोस्ट ऑफिसमधील आर आय सी टी मशिन चोरून नेले व नंतर गडगा येथील दत्तकृपा मेडीकलचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून नगदी 30,000/–रूपये, कपडे कॅमेरे व डोंगल तसेच पोस्ट ऑफिसचे आर आय सी टी मशिन असा एकुण 98,300/–रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सोपान शेषेराव पाटील, वय 66 वर्षे, व्यवसाय कापड दुकाण रा. रातोळी ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नायगांव** गुरन 14/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाघमारे, मो.क्रं. 9096618241** हे करीत आहेत.

## 3)चोरी :—

**1)नांदेड ग्रामीण** :—दिनांक 02.02.2023 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **शिवाजी पुतळा सिडको ते लातुर फाटा दरम्यान ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी ही शिवाजी पुतळा सिडको ते लातुर फाटा दरम्यान ऑटोने प्रवास करीत असतांना बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे गंठण 33 ग्रॅम वजनाचे किंमती 68,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शांता भ्र चंद्रकांत आसनेवार, वय 46 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. एमआयडीसी बळीरामपुर ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 88/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1749 भारती, मो.क्र. 9096270187** हे करीत आहेत.

## 4)मोटार सायकल चोरी :—

**1)माहुर** :—दिनांक 08.02.2023 रोजी दुपारी 03.45 वा. चे सुमारास, **रेणुका माता मंदीर ते दत्तशिखरकडे जाणारे रोड वरील प्रसादाचे शेवटचे दुकानाचे बाजुस माहुर ता. माहुर जि. नांदेड**, यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर कंपणीची मो सा क्रमांक एमएच./29–बीके–5144 किंमत अंदाजे 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी रामदास सुभाष पाचपुते, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पोखरी पोस्ट हुळी ता. पुसद जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्ट माहुर** गुरनं 10/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/764 जाधव, मो.क्र. 7887687478** हे करीत आहे.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**भाग्यनगर** :– 18.09.2022 रोजी चे 10.00 ते दिनांक 08.12.2023 रोजी चे 14.00 वा. चे दरम्यान, **जि. अदमदनगर व अनिकेतनगर नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या आई वडीलांकडुन अहमदनगर येथे फ्लॅट घेण्यासाठी 50,00,000/– रूपये घेवून ये म्हणुन फिर्यादीस मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 63/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा असुन **तपास पोहेकॉ/06 हंबर्डे, मो. क्रं. 9881028300** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 10.02.2023 रोजी चे 19.15 वा. चे सुमारास, **रेडीयमच्या दुकाना समोर धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार व इतर चार आरोपीतांनी फिर्यादीचा भाऊ नामे सय्यद सैफअली हा धनेगाव येथे रेडीयमच्या दुकानाजवळ बसला असता यातील आरोपी हे टाटा सफारी गाडी क्रमांक एमएच–20/बीवाय–9111 मध्ये येवुन गैरकादयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे भावाजवळ आले व जुन्या भांडणाचे कारणावरून शिवीगाळ करून गावठी कठयाच्या धाक दाखवुन लोखंडी रॉडने फिर्यादीचे भावाचे डोक्यात, चाकुने पोटात मारून गंभीर दुखापत केली व फिर्यादी सोडवण्यास गेला असता फिर्यादीच्या पाठीवर, डोक्यावर व उजव्या हातावर लाखेडी रॉडने मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी सय्यद फैजलअली पि. सय्यद नुरअली, वय 31 वर्षे, व्यवसाय चालक रा. एकबालनगर धनेगाव ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 90/2023 कलम 326, 143, 147, 148, 149, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बालाजी नरवटे, मो. नं. 8149863325** हे करीत आहेत.

## 6)शासकीय कामात अडथळा :–

**1)रामतिर्थ** :– दिनांक 12.02.2023 रोजी 10.45 वा. सुमारास, **देगलुर ते नर्सी रोडवर नरसी चौकी ता. नायगांव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व सोबत महिला पोना 1409 स्वामी असे नरसी चौकी येथे डयुटी करत असतांना यातील आरोपी बाई हिने नरसी चौक येथे रोडवर गोंधळ घालुन अडथळा निर्माण करत असतांना यातील फिर्यादी व मपोना 1409 असे दोघानी तिस समजावुन सांगत असतांना आरोपी बाईने अश्लील भाषेत शिवीगाळ केली धक्काबुकी करून कपडे फाडुन मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी मपोकॉ/101, सुप्रिया दत्तात्रय मगर, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 22/2023 कलम 353, 323, 294, 332, 332, भादवी सह कलम 110, 112/117 मपोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शेख, मो.क्र. 9834255985** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**किनवट** :– दिनांक 11.02.2023 रोजी 23.30 वा. चे सुमारास, **शिवदरा पाटी जवळ ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 6720/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2495, गणेश तुकाराम मुरमुरे, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 18/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पवार, मो.नं. 9922921694** हे करीत आहेत.

## 8)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**कुंटूर** :–दिनांक 08.02.2023 रोजी चे 15.20 वा. चे सुमारास, **मौ. इकळीमाळ शिवार ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सय्यद मगदुम पि. सय्यद अब्दुलसाब, वय 41 वर्षे, व्यवसाय शेती रा. टेंभुर्णी ता. नायगांव जि. नांदेड**, हा मौ इकळी माळ शिवारातील शेतात टाळकी ज्वारीस पाणी देण्यासाठी विहीरीवरील विद्युत मोटार चालु करीत असतांना विद्युत शॉक लागुन मरण पावला. वगैरे **खबर देणार सय्यद नबीसाब पि. सय्यद अब्दुलसाब, वय 70 वर्षे, व्यवसाय शेती रा. टेंभुर्णी ता. नायगाव जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कुंटूर** आ. मृ. 03/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1592 निकम, मो.नं. 9423656516** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड